ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017

REVIEW OF RESEARCH

# रोकडविरहित अर्थव्यवस्था / समाज - फायदे व तोटे

**प्रा. डॉ. सुरेश दगडू पाटील**
**ज.जी.म.वि.प्र. समाजाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , जळगांव.**

### प्रस्तावना -



काळा पैसा व्यवहारातून बाहेर काढण्यासाठी सरकारने ५०० ते १०० रु. च्या नोटा व्यवहारातुन बाहेर काढण्याचे सरकारने ठरविले व त्यानुसार रोख व्यवहारातुन सर्वात मोठे चलन बाद केले परिणाम स्वरुप अरोखी या व्यवहारांना वाव मिळाला. अरोखीचे व्यवहार म्हणजे कॅशलेस व्यवहार या व्यवहारात प्रत्यक्षात रोख चलनाचा वापर न करता त्याऐवजी क्रेडीटकार्ड व डेबीडकार्डच्या सहाय्याने वस्तु व सेवांची खरेदी करणे होय.

एकंदरीत अरोखीच्या व्यवहारासाठी अनेक पध्दतीचा वापर केला जाऊ शकतो. यात डेबीट कार्ड बरोबरच ऑन लाईन बँकींगचा देखील वापर केला जातो तसेच डिजीटल बटवा, पी.टी.एम. ऑक्सीजन यासारख्या अनेक ॲप्स आहेत ज्यांच्या सहाय्याने रोखीचे व्यवहार केले जाऊ शकतात. तसेच UPI - No, USD चेक- क्रेडीट कार्ड, प्रिपेट कार्ड यासारख्या साधनांच्या सहाय्याने व्यवहार करता येऊ शकतो.

### संशोधन पध्दती -

सदर संशोधन लेखाकरीता दुय्यम साधनांचा वापर केला असून त्यामध्ये वर्तमानपत्रातील विविध लेख, वृत्तवाहिन्यांवरील चर्चा, मासिके, तज्ज्ञांची मते विचारात घेण्यात आलेली आहे. सध्याचा विषय अत्यंत ज्वलंत असून संशोधन लेख म्हणून सदर विषयाची निवड केलेली आहे.

### संशोधनाची उद्दिष्ट्ये -

१. भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध घटकांवर विमुद्रीकरणाचा परिणाम अभ्यासणे.
२. शासनाने ठरविलेल्या कॅशलेस व्यवहाराचा परिणाम अभ्यासणे.

### संशोधनाची गृहितके -

१. भारतीय अर्थव्यवस्थेत विमुद्रीकरणाचा अनुकूल परिणाम दिसून येत आहे.
२. रोख व्यवहारांऐवजी कॅशलेस व्यवहाराच्या प्रमाणात वाढ होत आहे.

### अ) रोकड रहीत अर्थव्यवस्थेचा अर्थ

ज्या अर्थव्यवस्थेत जास्तीत जास्त कार्डने किंवा डिजिटल व्यवहार असतात. त्या अर्थव्यवस्थेस रोकडरहित अर्थव्यवस्था असे म्हणतात. अशा अर्थव्यवस्थेत भौतिक पैशाचा येणे आणि जाण्याचा प्रवाह कमीत कमी असतो.

### रोकडरहित अर्थव्यवस्था काय ?

नोव्हेंबर २०१६ या महिन्यात आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही योजना आखली होती. त्यांनी काळ्या पैशाला आळा घालण्यासाठी ५०० व १००० च्या नोटा बाद करुन नवीन ५०० व २००० रुपयाच्या नोटा चलनात आणल्या यामुळे काळ्या पैशाला आळा बसू शकतो.

उपभोग्य वस्तु व सेवा यांचा विनिमय करण्यासाठी रोकड पैशाचा उपयोग न करता डिजिटल माध्यमाचा वापर करुन व्यवहार पूर्ण केले जातात, त्या रोकडरहित व्यवहार असे म्हणतात. शासनाच्या विमुद्रीकरणामागील मुख्य उदिष्ट म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थाही रोकडरहित अर्थव्यवस्था तयार करणे हा असल्योच दिसून येत आहेत. यात रोख व्यवहाराऐवजी डेबीटकार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग,ऑनलाइन व्यवहार, इ-बँकिंग, चेक्स इ. द्वारे कॅशलेश व्यवहाराचा वापर वाढविणे. रोकडरहित व्यवहार पाच प्रकारात करता येतो.

१) यूपीआय

२) प्रिपेड वॉलेट
३) यु.एस.एस.डी.
४) इनेबल्ड पेमेंट
५) कार्ड
ही रोकडरहित व्यवहार साधने

**अ) यूपीआय (युनीफाईट पेमेंट इंटरफेस)**

१) या संबंधीचा ॲप गुगल प्ले स्टोअरवर मिळेल ज्यातून याला आपल्या स्मार्ट फोनमध्ये डाऊनलोड करता येऊ शकते.
२) यू.पी.आय. द्वारे एका दिवसात ५० रुपयांपासून १,००,००० रु. पर्यंतची रक्कम हस्तांतर करता येऊ शेकते.
३) यू.पी.आय. २४ तास ७ ही दिवस काम करते.
४) यू.पी.आय. एक व्हर्सुअल आय.डी. पासून दुसऱ्या व्हर्सुअल आय.डी.पर्यंत फंड / निधी हस्तांतर करतो.
५) यु.पी. आयमध्ये आपल्याला आपली व्हर्सुअल. आय.डी. आपल्या बँकेतुन मिळणार.

**ब) प्रिपेड वॉलेट - (ई - बटवा)**

१) पिप्रेड वॉलेट एक प्रकारे वॉलेट बटवा चे डिजिटलाइजेशन आहे. याला बटवा म्हटले जाऊ शकते / असे म्हणू शकतो.
२) मोबाईलही आता बटवा झाले आहे.
३) व्हॉट्सॲप वरुन फोटो पाठविणे किंवा प्रिपेड वॉलेटवरुन पैसे पाठविणे दोन्ही एक सारखे आहे.

**क) यू.एस.एस.डी.**

**यू.एस.एस.डी. सेवेचा उपयोग कोण करु शकतो ?**

असे ग्राहक की ज्यांनी मोबाईल बँकिंग सेवेचा लाभ घेण्यासाठी पंजीकरण नोंदणी केली आहे. असेच या सेवेचा उपयोग करु शकतात.

**यू.एस.एस.डी. सेवेचा प्रयोग कोणत्या पध्दतीने करता येऊ शकतो ?**

सदस्य बँकेचे ग्राहक या सुविधाजनक सेवेचा उपयोग आपल्या पंजीकृत / नोंदणीकृत फोनवरुन * ९९# वरुन किंवा मोबाईलवर दिसणाऱ्या परस्पर मेनूच्या माध्यामातून देवाण - घेवाण करु शकतात. कार्यशीतेचा प्रवाह खालीलप्रमाणे दर्शविलेला आहे.

ग्राहकाला आपला हँडसेट वर *९९# डायल करायचा आहे आणि खालील प्रमाणे चित्र दिसेल. या कार्यशीलतेत जमा रकमेची माहिती / लघुविवरण दाखविलेले आहे.

**यू.एस.एस.डी. साठी आवश्यक बाबी -**

१) आपले बँकेत खाते पाहिजे.
२) आपल्या मोबाईमध्ये जी.एस.एम. ची उपलब्धता असली पाहिजे.

**ड) इनेबल्ट पेमेंट सिस्टिम -**

१) ज्या लोकांचे बँकेत खाते आधारकार्डशी जोडले गेलेले आहे. त्यांच्यासाठी त्यांचे आधार कार्ड ही बँक आहे.
२) निधी हस्तांतर शिल्लक रकमेची चौकशी, आंतर बँक व्यवहार, रोकड जमा करणे व काढणे. आता हे आधार कार्डवर अवलंबुन आहे. या आधार इनेबल्ट या मशीनचा उपयोग करतात. पी.ओ.एस. मशीन हातात घेऊन चालविता येऊ शकते.

**इ) कार्डस पी.ओ.एस. -**

पी.ओ.एस. मशीनचा उपयोग कुठे केला जातो. व्यापारी लोक विक्रीच्या ठिकाणी ग्राहकाकडून क्रेडीट व डेबिट कार्डाच्या सहाय्याने खरेदी केलेल्या मालाची रक्कम मिळविण्यासाठी या मशीनचा उपयोग करतात. पी.ओ.एस. मशीन हातात घेऊन चालविता येऊ शकते.

**ऑनलाईन पेमेंट करताना घ्यावयाची दक्षता -**

**१) नेट बँकिंग -** आपण जर नेट बँकिंगद्वारे करीत असाल युजर नेम ॲन्ड पासवर्ड चा वापर करावा. त्याच सारखी दिसणारी दुसऱ्या इतर वेबसाईटचा वापर करु नये ही काळजी घेतली पाहिजे.

**२) डेबिट कार्ड -** आपण डेबिट कार्डद्वारे व्यवहार करीत असाल तर डेबिट कार्डशी जोडलेले ३ डी. सर्व्हीस तसेच Verifide by visa याचा वापर करणे योग्य राहील.

**३) क्रेडीट कार्ड -** याक्रेडिट कार्डद्वारे व्यवहार करतांना जास्त काळजी घेतली पाहिजे. आजकाल बहुतेक वेबसाईटवर फक्त क्रेडिट कार्डचा नंबर आणि वैधता कळल्यावरही व्यवहार करता येऊ शकतो. यासाठी क्रेडीट कार्ड सांभाळून आणि सुरक्षित ठेवले पाहिजेत. क्रेडिट कार्डद्वारे व्यवहार करतांना आपल्याला इ.एम.आय. ची सुविधा मिळते आणि आपण त्यांचा वापर करीत असाल तर पहिल्यापासून व्याजदर आणि कालावधी जाणून घेतला पाहिजे.

**४) वॉलेट पेपर-** वॉलेट पेपर हे व्यवहार करण्योच नवीन माध्यम आहे. याचा वापर करण्याच्या अगोदर आपल्या प्रिपेड मोबाईलप्रमाणेच याला चार्ज करुन घ्यावा लागतो. जर आपण वॉलेट पेमेंटचा उपयोग करत असाल तर आपला वॉलेट सुरक्षित वेबसाईटवर आहे हे समजून घेतले पाहिजे. कोणत्याही प्रकारे ऑनलाईन व्यवहारामध्ये वन टाईम पासवर्ड चा वापर केला गेला पाहिजे.

रोकडरहित अर्थव्यवस्थेचे फायदे आणि तोटे खालीलप्रमाणे -

### ब) रोकडरहित अर्थव्यवस्थेचे फायदे -

शासनाच्या दृष्टीने अरोखीच्या व्यवहारांचे अनेक फायदे आहेत. शासनाला अरोखीच्या व्यवहारामुळे वस्तू व सेवांच्या खरेदी विक्रीत पारदर्शकता आणणे सोपे जाईल तसेच कर चोरी करणाऱ्यावर चाप लावणे सहज शक्य आहे असे अनेक फायदे अरोखीच्या व्यवहाराचे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### अरोखीच्या / बिनारोखीच्या व्यवहाराचे फायदे -

**१) टॅक्स चोरी करणे मुश्कील -** सर्व व्यवहार डेबिड कार्ड व प्रिपेड कार्ड याद्वारे होत असल्यामुळे वस्तु व सेवांच्या खरेदीत पारदर्शकता येईल व कर चोरी करणे मुश्कील होईल.

**२) नकली नोटाच्या समस्येपासून सुटका -** सर्व व्यवहार अरोखीने झाल्यामुळे प्रत्यक्ष चलनाचा वापर कमीत कमी होणार व व्यवहारात पारदर्शकता राहणार परीणामी सर्व चलनाचे व्यवहार ऑनलाईलन दिसणार म्हणजेच नकली चलनाला वाव मिळणार नाही. जाली / नकली नोटांच्या समस्येपासून कायम सुटका मिळणार.

**३) बँकांडे पैशाची उपलब्धता -** ऑनलाईन व्यवहारामुळे उपभोक्ते स्वत: जवळ पैसे कमी बाळगतील परिणामी सर्व पैसा बँकांकडे उपलब्ध राहील त्यामुळे बँकांची पतनिर्मिती वाढेल व विकास कामाला कर्ज देण्यासाठी बँकांकडे पैसा उपलब्ध राहू शकेल.

**४) आंतकवादात होणारा निधीचा पुरवठा बंद -** काळापैसा निर्माण झाला तर त्या पैशाचा दुरुपयोग आंतकवादांना देण्यासाठी करतात परंतु अरोखीच्या व्यवहारामुळे प्रत्यक्ष चलनाचा वापर कमी होईल. टॅक्स पाहिजे तेवढा द्यावा लागेल काळ्या पैशाचे प्रमाण कमी होऊन आंतकावादासाठी घटकांना देखील पैसा उपलब्ध होणार नाही.

**५)** ई-कॉमर्स सारख्या घटकांना प्रवेश मिळेल.

**६)** रोकडरहित अर्थव्यवस्थेत डिजिटलायझेशन तंत्रज्ञानाचा माध्यमाने वेळेची बचत होते.

**७)** अवैध आणि अनैतिक व असंविधानिक मार्गांना काही काळातच आळा बसू शकतो.

**८)** कॅशलेस अर्थव्यवस्थेमार्फत काळ्या पैशाला आळा बसतो. काळा पैसा अर्थव्यवस्थेतुन बहिष्कृत होतो.

**९)** अशी अर्थव्यवस्था आपण अंगीकारली तर द्रवरुप पैशाचे प्रमाण कमी होते.

**१०)** ज्या प्रमाणात रोख रक्कम सोबत ठेवण्यास अडचण येते त्या तुनलेने कॅशलेस अर्थव्यवस्थेसाठी कार्ड सहजपणे हाताळता येते व व सोबतही ठेवू शकतो.

**११)** या अर्थव्यवस्थेत प्रत्येक देवाण - घेवाणीच्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवता येते आणि कर आधारित निर्णय घेण्यासाठी देखील उपयुकत ठरु शकते.

### क) रोकडरहित अर्थव्यवस्थेचे तोटे (Disadvantages of Cashless Society)

ज्या प्रमाणे अरोखीच्या व्यवहाराचे फायदे आहेत त्याप्रमाणे काही तोटे देखील आहेत.

१) काही क्षाणातच हॅकर्स संपूर्ण अर्थव्यवस्थेत आपल्या रोकडरहित व्यवहार खात्यावर अवैधरित्या नियंत्रण मिळवितात. सायबर गुन्हे हे रोकडरहित अर्थव्यवस्थेसमोर मोठे आव्हान आहे. सायबर क्राईम फसवेगिरीत वाढ होण्याची शक्यता आहे.

२) रोकडरहित अर्थव्यवस्थेत प्रत्येकाने जागृत न राहिल्यास परिस्थिती अधिक गंभीर होईल.

३) ज्येष्ठ नागरिक या व्यवहारासंबंधी अज्ञानी आहेत. त्यांना तांत्रिक व्यवहाराचे प्रशिक्षण देणे हे एक मोठे आव्हान आहे. अशिक्षित लोकांना अरोखीचे Cash Less व्यवहार करता येणे शक्य नाही.

४) बँकेतील नेहमीची कार्यपध्दती काही प्रमाणात गुंतागुंतीची व किचकट होऊन बसेल. मोठ्या बँकांची मनमानी वाढेल.

५) आपल्या देशामध्ये सर्व ठिकाणी इंटरनेटचे जाळे शक्य नसल्यामुळे आणि रोकडरहित अर्थव्यवस्थेत आर्थिक व्यवहार अंमलात आणण्यासाठी इंटरनेटचे जाळे सर्वदूर असणे आवश्यक आहे. अरोखीचे व्यवहार करण्यासाठी लागणारी सुविधा भारतात उपलब्ध नाही.

६) टेक्लॉलॉजीची मर्यादा व अवलंबित्व वाढेल.

७) मर्यादेपेक्षा जास्त नियंत्रणामुळे समस्या वाढतील

अशाप्रकारे आपण हे बदल अंगीकृत करुन किंवा स्विकारुन काळ्या पैशाला आळा घालून आणि काळा पैसा देशातून हद्दपार करु.

### संदर्भ -

१. व्हिजन रिसर्च - कॉमर्स, मॅनेजमेंट ॲण्ड सोशल सायन्स.
२. Dishti Current Affairs Today, January २०१७.
३. सकाळ साप्ताहिक-मासिक, नोव्हेंबर-डिसेंबर २०१६.
४. www.actingman.com
५. लोकप्रभा - मासिक, नोव्हेंबर-डिसेंबर २०१६.
६. लोकसत्ता - वर्तमानपत्र, १५-१८ नोव्हेंबर, २०१६.
७. कुक्षेत्र - मासिक, डिसेंबर २०१६, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.